**जिल्हा व सत्र न्यायालय, बीड**

जा. कमांक / न्या.वि. / 14053 /2024

दिनांक : 31 / 12 / 2024

:: **कार्यालयीन आदेश** ::

**जिल्हा न्यायालय, न्याय विभाग, बीड यांचे यापुर्वीचे जामीन अर्ज/ रिमांड कामाकाजाबाबत कार्यालयीन आदेश कमांक 12850/2024, दिनांक 29/11/2024 मध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत.**

**अ** – पोलीस स्टेशन **शिवाजी नगर, पेठ बीड, नेकनूर** या पोलीस स्टेशन मधील गुन्हयातील दाखल होणारे नियमित व अटकपुर्व जामीन अर्ज ( विशेष कायदयातंर्गत दाखल होणारे जामीन अर्ज वगळता) चा कार्यभार पुढे नमुद केलेल्या न्यायीक अधिकारी यांचेकडे राहील.

**ब** – पोलीस स्टेशन **बीड शहर, बीड ग्रामीण, आष्टी** या पोलीस स्टेशन मधील गुन्हयातील दाखल होणारे नियमित व अटकपुर्व जामीन अर्ज ( विशेष कायदयातंर्गत दाखल होणारे जामीन अर्ज वगळता)चा कार्यभार पुढे नमुद केलेल्या न्यायीक अधिकारी यांचेकडे राहील.

**क** – पोलीस स्टेशन **गेवराई, तलवाडा, चकलांबा, पिंपळनेर** या पोलीस स्टेशन मधील गुन्हयातील दाखल होणारे नियमित व अटकपुर्व जामीन अर्ज ( विशेष कायदयातंर्गत दाखल होणारे जामीन अर्ज वगळता) चा कार्यभार पुढे नमुद केलेल्या न्यायीक अधिकारी यांचेकडे राहील.

**ड** – पोलीस स्टेशन **पाटोदा, सायबर पो. स्टे.** या पोलीस स्टेशन मधील गुन्हयातील दाखल होणारे नियमित व अटकपुर्व जामीन अर्ज (विशेष कायदयातंर्गत दाखल होणारे जामीन अर्ज वगळता) चा कार्यभार पुढे नमुद केलेल्या न्यायीक अधिकारी यांचेकडे राहील.

**इ** – पोलीस स्टेशन **शिरुर, अंमळनेर व अंमोरा** या पोलीस स्टेशन मधील गुन्हयातील दाखल होणारे नियमित व अटकपुर्व जामीन अर्ज ( विशेष कायदयातंर्गत दाखल होणारे जामीन अर्ज वगळता) चा कार्यभार पुढे नमुद केलेल्या न्यायीक अधिकारी यांचेकडे राहील.

**ई** – **विशेष कायदयातंर्गत दाखल होणारे सर्व नियमित व अटकपुर्व जामीन अर्जाचा व रिमांडचा कार्यभार पुढे नमुद केलेल्या न्यायीक अधिकारी यांचेकडे राहील.** (महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा **MCOCA & POCSO Act** चे नियमित, अटकपुर्व जामीन व रिमांड कामकाजाचा कार्यभार वगळता.)

**फ** – महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा **(MCOCA)** चे नियमित, अटकपुर्व जामीन व रिमांड कामकाजाचा कार्यभार या न्यायालयाचे आदेश क. **4561/2022 दि. 05/04/2022 अन्वये जिल्हा न्यायाधीश–1 तथा अति. सत्र न्यायाधीश, बीड** यांचेकडे राहील. **तसेच POCSO Act चे नियमीत, अटकपुर्व जामीन व रिमांड कामकाजाचा कार्यभार जिल्हा न्यायाधीश–1 तथा अति. सत्र न्यायाधीश, बीड यांचेकडे राहील.**

| **अ.क** | **न्यायालयाचे नांव** |
|---|---|
| **अ, ब, क, ड, इ** | श्री. के. आर. जोगळेकर, जिल्हा न्यायाधीश–4 व अति. सत्र न्यायाधीश, बीड |
| **ई** | श्री. व्ही. एच. पाटवदकर, जिल्हा न्यायाधीश–2 व अति. सत्र न्यायाधीश, बीड |
| **फ** | श्रीमती एस. आर. पाटील, जिल्हा न्यायाधीश–1 व अति. सत्र न्यायाधीश, बीड |

## सार्वजनिक सुट्टीचे दिवशी रिमांड कामाचा कार्यभार खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र | रिमांडचे काम ठेवण्यात आलेल्या न्यायालयाचे नांव | दिनांक |
|---|---|---|
| 1 | मा. एस. आर. पाटील, जिल्हा न्यायाधीश–1 व अति. सत्र न्यायाधीश, बीड | 12/01/2025, 26/01/2025 |
| 2 | मा. व्ही. एच. पाटवदकर, जिल्हा न्यायाधीश–2 व अति. सत्र न्यायाधीश, बीड | 14/01/2025 |
| 3 | मा. एस. आर. शिंदे, जिल्हा न्यायाधीश–3 व अति. सत्र न्यायाधीश, बीड | 05/01/2025, 19/01/2025 |
| 4 | मा. श्री. के. आर. जोगळेकर, जिल्हा न्यायाधीश–4 व अति. सत्र न्यायाधीश, बीड | 11/01/2025, 25/01/2025 |

1. सार्वजनिक सुट्टीचे दिवशी रिमांडचे काम हे दुपारी 02.45 ते 4.00 वाजेपर्यंत करावे. रिमांड कामकाजासाठी संबंधीत न्यायीक अधिका–यांनी त्यांचे न्यायालयातील आवश्यक असलेल्या वर्ग–3 व वर्ग–4 च्या कर्मचा–यांची नेमणुक करावी. तसेच वरील दिवशी जर संबंधीत न्यायिक अधिकारी मुख्यालयी हजर नसतील तर रिमांडचे काम त्यांचे प्रभारी अधिकारी यांनी पहावे.

2. ज्या गुन्हयातील दोषारोपपत्र या न्यायालयात दाखल नसेल अशा गुन्हा रजि. क्रमांक मधील प्रथम अटकपुर्व किंवा नियमीत जामीन अर्ज सदर आदेशातील **अ, ब, क, ड, इ, ई** प्रमाणे वर्ग होतील. परंतु, पहिला अटकपूर्व किंवा नियमीत जामीन अर्ज दाखल होवून निकाली निघाला व त्याच गुन्हयातील त्याच किंवा इतर आरोपींचा जामीन अर्ज दाखल झाला तर त्याच न्यायालयाकडे वर्ग करावा.

3. ज्या गुन्हयातील दोषारोपपत्र या न्यायालयात दाखल नसेल अशा गुन्हा रजि. क्रमांक मधील पहिला नियमीत जामीन अर्ज ज्या न्यायालयाने निकाली काढला असेल आणि त्याच आरोपीचे नंतर येणारे नियमीत जामीन अर्ज हे त्याच न्यायालयाकडे वर्ग होतील.

4. जर एखादया न्यायालयाने अटकपुर्व किंवा नियमीत जामीन अर्ज निकाली काढला असेल व ते न्यायिक अधिकारी सध्या बदलुन गेले असतील किंवा सेवानिवृत्त झाले असतील व त्याच आरोपीचे पुन्हा अटकपुर्व किंवा नियमीत जामीन अर्ज दाखल झाले तर ते अर्ज उपरोक्त आदेशाप्रमाणे वर्ग करण्यात येतील.

5. ज्या गुन्हयातील दोषारोपपत्र या न्यायालयात दाखल असेल अशा प्रकरणातील जामीन अर्ज हे ज्या न्यायालयात दोषारोपपत्र प्रलंबीत आहे त्या न्यायालयाकडे वर्ग होतील.

6. ज्या गुन्हयातील दोषारोपपत्र या न्यायालयात दाखल असेल व आरोपी हा फरार असेल अशा प्रकरणातील अटकपुर्व जामीन अर्ज/नियमीत जामीन अर्ज हे ज्या न्यायालयात दोषारोपपत्र प्रलंबीत आहे त्या न्यायालयाकडे वर्ग होतील.

7. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बीड यांचे कडील दाखल होणा–या गुन्हयामधील जामीन अर्ज हे ज्या पोलीस स्टेशनच्या अधिकार क्षेत्रात गुन्हा घडला असेल व ते पोलीस स्टेशन ज्या न्यायालयाकडे ठेवण्यात आले आहे त्या न्यायालयाकडे वर्ग होतील.

सदरील आदेश दिनांक 1 जानेवारी 2025 पासून एक महिना लागू राहील.

A L Yawalkar 31/12/24

**(आनंद एल. यावलकर)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड.**